UPLOADED ON
sic.maharashtra.gov.in

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अन्वये प्राप्त तक्रार**

**तक्रार क्र. २१/२०१७**

| | | |
|---|---|---|
| १. श्री. रामेश्वर गणेशप्रसाद पाठक, रजनी नगर, खात रोड, भंडारा | : | तक्रारकर्ता |
| **विरुध्द** | | |
| २. जन माहिती अधिकारी, सरस्वती विद्यालय, रेवराल, ता.मौदा, जि.नागपूर | : | उत्तरवादी |
| ३. प्रथम अपिलीय अधिकारी, सरस्वती विद्यालय, रेवराल, ता.मौदा, जि.नागपूर | : | उत्तरवादी |

**(आदेश पारित दिनांक १०.०७.२०१७)**

तक्रारकर्ता श्री. रामेश्वर गणेशप्रसाद पाठक यांनी दिनांक ०२.०२.२०१७ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १८(१) नुसार तक्रार दाखल केली. त्यावर आयोगाने तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.०६.२०१७ रोजी नोटीस काढून दिनांक १०.०७.२०१७ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने आज सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी तथा सहा.शिक्षक, श्री.अशोक ग.गिरी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.निलकंठ एस.आकरे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी आयोगाने अपील क्र. १८३८/२०१६ मध्ये दिनांक ०७.१०.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे कलम १८(१) अंतर्गत तक्रार दाखल केलेली आहे. आयोगाने अपील क्र. १८३८/२०१६ मध्ये दिनांक ०७.१०.२०१६ रोजी पारित केलेला आदेश खालीलप्रमाणे आहे.

"प्रस्तूत व्दितीय अपील मंजूर करण्यात येत असून अपिलार्थी यांनी जोडपत्र अ प्रमाणे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी कलम २(च) नुसार उपलब्ध आहे तशा स्वरुपात अपिलार्थीस कलम ७(६) नुसार १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.जन माहिती अधिकारी जन माहिती अधिकारी, सरस्वती विद्यालय, रेवराल, ता.मौदा, जि.नागपूरयांनी विहीत मुदतीत माहिती न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(१) चा भंग केला असे प्रधमदर्शनी



Scanned by CamScanner

निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९(८)(ग) व २०(१) अन्वये शास्ती का करु नये? याचा खुलासा त्यांनी आयोगासमोर उपस्थित राहून करावा. त्यांनी खुलासा सादर न केल्यास आयोग त्यावर एकतर्फी निर्णय घेईल. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेतल्याने कलम १९(६) चा भंग केलेला आहे. त्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १० जून, २००८ रोजीचे परिपत्रक व कलम १९(८)(ग) व २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस का करु नये? याचा खुलासा आयोगासमोर स्वतः उपस्थित राहून करावा. वर्तमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ७(१), कलम १९(६) किवा अन्य कलमांच्या भंगास जबाबदार व्यक्तींची नावे निश्चित करुन त्यांना हा आदेश बजवावा व त्याची पोच जतन करावी . अन्यथा ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींनुसार शास्तीस पात्र ठरतील, याची नोंद घ्यावी."

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर आज दिनांक १०.०७.२०१७ रोजी सुनावणी घेण्यात आली. आज सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. तक्रारकर्ता यांनी आयोगास सांगितले की, मा.आयोगाच्या दिनांक ०७.१०.२०१६ च्या आदेशानुसार संचमान्यतेची प्रमाणित प्रत आजपर्यंत देण्यात आलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, संचमान्यतेची प्रत आज आयोगासमोर आणलेली असून ती देण्यात हरकत नाही.

सदर प्रकरणी आज आयोगासमक्ष जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्तास संचमान्यतेची प्रत देण्यात आली. सारांशाने तक्रारकर्तास आवश्यक असलेली माहिती दिलेली असल्यामुळे प्रस्तूत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ल.धारुरकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**नागपूर**
**दिनांक १०.०७.२०१७**

**जा.क्र.----------दि.----------**

मंगेश/कांबळे/२१-२०१७



Scanned by CamScanner